# १ कार्यकारी सारांश

## १.१ आताच्या याचिकेबद्दलचा व्यापक दृष्टीकोन

### ऐतिहासिक परिप्रेक्ष्य

टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (''टाटा पॉवर'') ही १९१९ साली स्थापन झालेली कंपनी आहे. १ एप्रिल २००० रोजी हाइड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० मध्ये स्थापना) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ मध्ये स्थापना) या कंपन्या टाटा पॉवरमध्ये विलीन करण्यात आल्या आणि त्या सर्वांची मिळून एक एकत्रित कंपनी बनली. या विलीनीकरणामुळे वरील दोन कंपन्यांचे परवानेसुद्धा विलीन करण्यात आले. आणि दिनांक १२ जुलै २००१ च्या ठराव क्र. आयइए - २००१/सीआर-१०५०९/एनआरजी - १ अन्वये महाराष्ट्र सरकारने टाटा पॉवरला त्यांच्या मुंबई परवाना क्षेत्रातील सर्वसाधारण जनतेला विद्युत पुरवठा करण्यासाठी तसेच वितरण परवानाधारकांना एकगठ्ठा विद्युत पुरवठा करण्यासाठी परवाना दिला.

विद्युत कायदा बनल्यानंतर आणि या सन्माननीय आयोगाने परवाना नियमावली जाहीर केल्यानंतर एक मानित परवानाधारक म्हणून टाटा पॉवरने विद्युत कायदा २००३ शी सुसंगत ठरण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी आपला परवाना सादर केला.

टाटा पॉवरला विद्युत कायदा २००३ खाली मानित पारेषण परवानाधारक (''टाटा पॉवर-टी'') म्हणून या सन्माननीय आयोगाने मान्यता दिली आहे.

टॅरिफ नियमावली आणि सन्माननीय आयोगाच्या आदेशांनुसार पहिला नियंत्रण कालावधी ३१ मार्च २०१० ला संपत असून दुसरा नियंत्रण कालावधी १ एप्रिल २०१० ला सुरु होत आहे. परंतु, सन्माननीय आयोगाच्या दिनांक १ डिसेंबर २००९ च्या निर्देशांनुसार टाटा पॉवर-टी ने टाटा पॉवर (टाटा पॉवर -टी) च्या पारेषण व्यवसायाचा (आ.व.२००९-१० साठीचा) विस्तृत वार्षिक कामगिरी आढावा (एपीआर) सादर केला होता ज्यामध्ये (i) आ.व.२००८-०९ साठीच्या कामगिरीचा सत्य पडताळा, (ii) आ.व.२००९-१० साठीच्या कामगिरीचा वार्षिक आढावा आणि (iii) आ.व. २०१०-११ साठी प्रक्षेपित 'एकत्रित महसूल आवश्यकता' (एआरआर) यांचा समावेश होता. सन्माननीय आयोगाने आ.व.२००९-१० साठीच्या एपीआरसाठी आणि आ.व.२०१०-११ साठीच्या एआरआर साठी ३ सप्टेंबर २०११ रोजी एक आदेश जारी केला होता.

सन्माननीय आयोगाने त्यानंतर ४ फेब्रुवारी २०११ रोजी एमवायटी नियमावली २०११ जारी केली. या एमवायटी नियमावलीच्या परिच्छेद ७.१ नुसार टाटा पॉवर-टी सारख्या पारेषण परवाना धारकाने १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१६ या पाच आर्थिक वर्षांचा समावेश असलेल्या नियंत्रण कालावधीसाठी 'व्यवसाय नियोजन' दाखल करणे आवश्यक आहे. तसेच एमवायटी नियमावलीच्या परिच्छेद ९.२ नुसार, एमवायटी याचिका दाखल करण्यापूर्वी हे 'व्यवसाय नियोजन' मंजूर होणे आवश्यक आहे. एमवायटी नियमावलीचा परिच्छेद ९.२ खाली उद्धत केला आहे.

''९.२) अर्जदाराने सादर केलेल्या 'व्यवसाय नियोजना'वर दिलेल्या आदेशात आयोगाने निर्धारित केलेला मार्ग अर्जदाराने त्यांच्या एकत्रित महसूल आवश्यकतांच्या (एआरआर) अंदाजात आणि / किंवा नियम ८ खाली लावण्यात आलेल्या वीज दर /शुल्क यातून अपेक्षित असलेल्या महसूलात समाविष्ट केला पाहिजे.''

मात्र, सन्माननीय आयोगाने २३ फेब्रुवारी २०११ च्या त्यांच्या आदेशात वरील कलमाला स्थगिती दिली आहे. म्हणून, आम्ही नम्र निवेदन करु इच्छितो की एमवायटी याचिका दाखल करण्यापूर्वी 'व्यवसाय नियोजन' सन्माननीय आयोगाकडून संमत होणे आवश्यक नाही. सन्माननीय आयोगाने त्यानंतर त्यांच्या पत्र क्र. एमईआरसी /टॅरिफ/२०११२०१२/००९४८ मध्ये टाटा पॉवर-टीला त्यांचा आ.व. २००९-१० साठीचा अंतिम सत्य पडताळा आणि आ.व. २०१०-११ साठीचा तात्पुरता सत्य पडताळा सादर करण्याचा निर्देश दिला. या निर्देशाची पूर्तता करण्यासाठी टाटा-पॉवर टी ही याचिका दाखल करत आहे.

नियंत्रण कालावधीसाठी 'व्यवसाय नियोजन' आयोगाच्या संमतीसाठी स्वतंत्रपणे दाखल केले जाईल.

**आताच्या याचिके-प्रति एकंदर दृष्टीकोन**

सन्माननीय आयोगाने निर्मिती, पारेषण आणि वितरण व्यवसायाच्या बहू-वार्षिक दरांसाठीच्या (एमवायटी) अटी व शर्ती ऑगस्ट २००५ मध्ये जाहीर केल्या (''टॅरिफ नियमावली''). त्या अनुषंगाने मागील, चालू आणि भविष्यातील कामगिरीविषयी माहिती देण्यासाठी निर्धारित केलेल्या विहित नमुन्यांमध्ये टाटा पॉवरने पहिल्या नियंत्रण कालावधीसाठी एमवायटी याचिका सन्माननीय आयोगाच्या विचारार्थ दाखल केली होती.

त्याप्रमाणे, टॅरिफ नियमावली २००५ नुसार आणि सन्माननीय आयोगाने जारी केलेले टॅरिफ आदेश विचारात घेऊन आ.व.२००९-१० साठीचा सत्य पडताळा आणि आ.व.२०१०–११ साठीचा वार्षिक कामगिरी आढावा दाखल करण्यात येत आहे.

**आ.व.२००९-१० साठी सत्य - पडताळा**

टाटा पॉवर - टी यांनी आपल्या पारेषण व्यवसायासाठी आ.व.२००९-१० च्या एपीआर याचिकेत, वर्षाच्या पहिल्या अर्धकालाच्या, म्हणजे एप्रिल २००९ ते सप्टेंबर २००९ साठीच्या प्रत्यक्ष कामगिरीवर आणि वर्षाच्या दुसऱ्या अर्धकालाच्या, म्हणजे ऑक्टोबर २००९ ते मार्च २०१० साठीच्या कामगिरीच्या सुधारित अंदाजावर आधारित आ.व. २००९-१० ची कामगिरी सादर केली होती.

सन्माननीय आयोगाने दिनांक ३ सप्टेंबर २०१० च्या त्यांच्या एपीआर आदेशात आ.व.२००९-१० च्या पहिल्या सहामाहीतील प्रत्यक्ष कामगिरीवर आणि आ.व.२००९-१० च्या दुसऱ्या सहामाहीतील अंदाजांवर आधारुन तात्पुरती सत्य पडताळणी केली होती.

टाटा पॉवर - टी सध्याच्या याचिकेसाठी आ.व. २००९-१० साठी पारेषण कार्याची विविध कार्यान्वयन आणि खर्च निगडित परिमाणांसह प्रत्यक्ष कामगिरी सादर करत आहे. शिवाय दीर्घकालीन कर्जावरील व्याज, चालू भांडवलावरील व्याज आणि इक्विटीवरील परताव्यासारख्या काही घटकांसंबधाने केलेली गणती ही माननीय आयोगाने विविध नियमावलीमध्ये आणि आदेशांमध्ये स्वीकृत केलेल्या निर्देशात्मक तत्त्वांनुसार आणि

सन्माननीय विद्युत न्यायाधिकरणाने त्यांच्या १५ जुलै २००९ आणि १४ फेब्रुवारी २०११ मधील निकालांमध्ये घेतलेल्या भूमिकेलासुद्धा धरुन आहे.

**आ.व. २०१०-११ चा वार्षिक कामगिरी आढावा (एपीआर)**

'टॅरिफ रेग्युलेशन्स २००५' मध्ये ठरवून दिल्याप्रमाणे सन्माननीय आयोगाने परवाना धारकाच्या (टाटा पॉवर - टी) कामगिरीचा 'वार्षिक आढावा' या वर्षासाठीच्या स्वीकृत आगाऊ अंदाजांसापेक्ष घेणे अपेक्षित आहे, ज्यासाठी चालू वर्षाच्या पहिल्या अर्धकालातील प्रत्यक्ष कामगिरीचा तसेच चालू वर्षातील दुसऱ्या अर्धकालासाठीच्या कामगिरीच्या अंदाजाचा आधार घेतला जातो. परंतु आमचे नम्र निवेदन आहे की आ.व.२०१०-११ संपले असल्यामुळे सन्माननीय आयोगाने आ.व.२०१०-११ साठीसुद्धा सत्य पडताळा घ्यावा.

आ.व. २०१०-११ समाप्त झाले असल्यामुळे टाटा पॉवर - टी पारेषण कार्यासाठी आ.व.२०१०-११ साठी प्रत्यक्ष कामगिरीवर आधारुन ही वार्षिक कामगिरी आढावा याचिका दाखल करीत आहे.

सन्माननीय आयोगाने आ.व. २०१०-११ साठीचा वीज दर आदेश ३ सप्टेंबर २०१० रोजी जारी केला ज्यात १ सप्टेंबर २०१० पासून त्यातील वीजदर लागू करण्यात आले. या आदेशानुसार सन्माननीय आयोगाद्वारे पुढील काळासाठी नवीन दर पुन्हा ठरविले जाईपर्यंत ३ सप्टेंबर २०१० च्या आदेशात नमूद करण्यात आलेले दर लागू राहतील.

**मालमत्ता आणि खर्चाचे विभाजन**

या याचिकेच्या हेतूसाठी, खर्चाचे कार्यानुसार विभक्तीकरण टाटा पॉवरकडे सध्या उपलब्ध असलेल्या माहितीच्या विभक्तीकरणावर आधारुन केले गेले आहे. टाटा पॉवरने खर्चाची आकडेवारी निर्मिती, पारेषण, वितरण, पुरवठा, मुख्य कार्यालय (एचओ) आणि सहाय्यभूत सेवा (एसएस) या कार्यांसाठी (''कार्य क्षेत्रे'') गोळा केली आहे. तसेच टाटा पॉवर ''मालमत्ता नोंदवही'' सुद्धा ठेवते ज्यात वरील कर्याक्षेत्रांसाठी ३१ मार्च रोजीनुसार मालमत्तांचा तपशील दिला आहे.

मुख्य कार्यालय आणि सहाय्यभूत सेवा यातील मालमत्ता आणि खर्चाच्या निर्मिती, पारेषण आणि वितरण तसेच पुरवठा कार्यांमधील (''मूलभूत क्षेत्रे'') विभाजनाचा आधार मागील याचिका दाखल करण्याच्यावेळी वापरलेल्या आधारानुसार असून त्याविषयी तपशीलवार चर्चा **भाग २.४** मध्ये केली आहे.

तसेच, सन्माननीय आयोगाने त्यांच्या मागील आदेशात भार नियंत्रण केंद्राचा (एलसीसी- लोड कंट्रोल सेंटर) खर्च निर्मिती, पारेषण व वितरण या मूलभूत कार्य क्षेत्रांत विभागला होता आणि हा खर्च सर्वसाधारणपणे कार्यचलन आणि देखभाल (ओ आणि एम) स्वरुपाचा असल्याने या विभाजनाचा समावेश त्या त्या व्यवसायाच्या 'ओ आणि एम' खर्चात केला होता. म्हणून, आ.व.२००९-१० चा एपीआर दाखल करण्याच्या मागील वेळेप्रमाणे टाटा पॉवरने एलसीसी खर्चाचे विभाजन खाली दर्शवलेल्या प्रमाणानुसार विविध मूलभूत कार्यक्षेत्रांत केले आहे आणि त्याचा समावेश 'ओ आणि एम' खर्चात केला आहे.

**तक्ता १-१ : एलसीसी खर्चाचे विभाजन**

| व्यवसाय क्षेत्र | हिस्सा |
|---|---|
| निर्मिती | 29% |
| पारेषण | 50% |
| वितरण | 21% |

## १.२ दिनांक १४ फेब्रुवारी २०११ च्या सन्माननीय एटीईच्या निकालाचा परिणाम

टाटा पॉवर - टी साठी आ.व.२००९-१० साठी वीजदर आदेश सन्माननीय आयोगाने २८ मे २००९ रोजी (२००८ चा दावा क्र.११२) जारी केला होता. या आदेशामध्ये सन्माननीय आयोगाने आ.व. २००७-०८ साठीचा खर्च ताडून पाहिला होता, आ.व.२००८-०९साठी तात्पुरता सत्य पडताळा केला होता, आणि आ.व.२००९-१० साठी ‘वार्षिक महसूल आवश्यकतां’साठी स्वीकृती दिली होती. सन्माननीय आयोगाने या तीन वर्षांसाठी वेगवेगळ्या प्रकाराखाली काही खर्चाची रक्कम अमान्य केली होती. या दर आदेशाविरुद्ध टाटा पॉवर - टी ने सन्माननीय विद्युत न्यायाधिकरणाकडे (एटीई) अपील दाखल केले होते. (२००९ चे अपील क्र.१७४) .

तदनंतर, टाटा पॉवरने आ.व. २००९-१० साठी त्यांची एपीआर याचिका डिसेंबर २००९ मध्ये दाखल केली होती ज्यामध्ये सन्माननीय एटीईकडून अनुकूल निर्णय प्राप्त होण्याच्या अटीला आधीन राहून अमान्य केल्या गेलेल्या खर्चाची मागणी करण्याचा कंपनीचा हक्क त्यांनी राखून ठेवला होता.

सन्माननीय एटीईने टाटा पॉवर - टी ने दाखल केलेल्या २००९ च्या अपील क्र.१७४ संबंधी १४ फेब्रुवारी २०११ रोजी आदेश पारित केला आणि या अपीलात नमूद केलेल्या विविध मुद्यांविषयीची टाटा पॉवर - टी ची बाजू उचलून धरली. या भागात सन्माननीय एटीईच्या विविध मुद्यांवरील आदेशाविषयी आणि सन्माननीय एटीईच्या आदेशाच्या परिणामे रक्कम पुन:प्राप्तीच्या टाटा पॉवर-टी च्या हक्काविषयी चर्चा केली आहे.

### १.२.१ चालू भांडवलावरील निर्देशात्मक व्याजाचा हक्क

टाटा पॉवर-टीने त्यांच्या २००९च्या अपील क्र.१७४ मध्ये असे म्हणणे मांडले होते की चालू भांडवलावरील खर्च हा भांडवली खर्चासाठी लागणाऱ्या वित्त पुरवठ्यासाठीच्या निर्देशात्मक कर्जावरील व्याज खर्चाप्रमाणेच एक निर्देशात्मक खर्चविषयक हक्क आहे, आणि चालू भांडवलावरील निर्देशात्मक व्याज आणि प्रत्यक्ष व्याज यामधील कोणताही फरक ग्राहकांबरोबर वाटून घ्यावयाच्या ‘कार्यक्षमता फायद्या’च्या स्वरुपात धरला जाता कामा नये. सन्माननीय एटीईने टाटा पॉवर - टीचा हा मुद्दा उचलून धरला आहे. या निर्णयामधील उतारा **भाग ३.२.१** मध्ये दिला आहे. सन्माननीय एटीईने दावा केलेल्या रक्कमांसबंधी कोणतीही अट किंवा धनापूर्ती विवरणाच्या अभ्यासासारखी याविषयी आणखी तपशीलात जाण्याची कोणतीही आवश्यकता नमूद केलेली नाही. सन्माननीय एटीईने तत्त्वाची मांडणी स्पष्टपणे केलेली असल्यामुळे सन्माननीय आयोगाला विनंती आहे की याआधी ग्राहकांकडे / वितरण परवानाधारकांकडे पुढे वाटून देण्यात आलेल्या या रक्कमा कंपनीकडे पुनर्स्थापित कराव्यात.

अशा रितीने आ.व. २००६-०७ आणि आ.व.२००७-०८ साठी चालू भांडवलावरील व्याज, ज्याचा हिस्सा ग्राहकांना / परवाने धारकांना 'कार्यक्षमता फायदा' समजून देण्यात आला, ती संपूर्ण रक्कम वसूल करण्यासाठी टाटा पॉवर - टी कडे हक्क आहे. खालील तक्यात आ.व. २००६-०७, आ.व.२००७-०८ आणि आ.व.२००८-०९ साठी टाटा पॉवर टीला परत मिळणार असणारी रक्कम सारांश रुपाने दिली आहे.

**तक्ता १-२ : चालू भांडवलावरील व्याजासंबंधी कार्यक्षमता फायद्याच्या हिस्से वाटप संदर्भातील हक्क**

रु कोटी

| तपशील | आ.व.२००६-०७ | आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ | एकूण |
|---|---|---|---|---|
| एमईआरसीने संमत केलेले चालू भांडवलावरील निर्देशात्मक व्याज | 4 | 5 | 7 | 16 |
| टाटा पॉवर टी ने सहन केलेले प्रत्यक्ष व्याज | 0 | 1 | 2 | 4 |
| एमईआरसीद्वारे कार्यक्षमता फायदा समजली गेलेली रक्कम | 4 | 4 | 4 | 12 |
| वितरण परवानाधारकांना वाटून दिलेली रक्कम | 1 | 1 | 1 | 4 |
| **एटीई निकालामुळे पुनर्स्थापित करण्याची रक्कम** | 1 | 1 | 1 | 4 |

## १.२.२ टाटा ब्रँड इक्विटी खर्चाप्रति केलेल्या प्रशासकीय व सर्वसाधारण खर्चांची अमान्यता

या बाबतीतसुद्धा सन्माननीय एटीईने टाटा पॉवर - टीच्या बाजूने अपील मंजूर केले आहे. परंतु, सन्माननीय आयोगाने २००९ च्या दावा क्र. ९७ मध्ये दिलेल्या दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजीच्या टॅरिफ आदेशात आ.व. २००७-०८, आ.व. २००८-०९ आणि आ.व.२००९-१० साठी ब्रँड इक्विटी याआधीच मंजूर केली आहे. म्हणून, उल्लेखित वर्षांसाठी ब्रँड इक्विटी खर्चासाठीची अधिकची वसुली टाटा पॉवर - टीने मागितलेली नाही.

## १.२.३ आयकराबाबत घेतलेली चूकीची भूमिका

सन्माननीय एटीईने वरील संदर्भातील २००९ च्या अपील क्र.१७४ मध्ये दिलेल्या त्यांच्या निकालात नियंत्रणात्मक करपूर्व नफ्याची गणती करताना केवळ इक्विटीवरील परतावा जमेस न धरता इक्विटीवरील परताव्याच्या जोडीला प्रोत्साहनपर सवलत (इन्सेंटिव) आणि कार्यक्षमता फायदा सुद्धा जमेस धरण्याचा सन्माननीय आयोगाला निर्देश दिला होता, आणि त्याचबरोबर असाही निर्देश दिला होता की कर काढण्यासाठी करमोजणी 'ग्रॉस अप' केली गेली पाहिजे. सन्माननीय एटीईने वरील विषयावरील तत्त्वे याआधीच घालून दिलेली असल्यामुळे आम्ही नम्र निवेदन करु इच्छितो की सन्माननीय आयोगाने सन्माननीय एटीईच्या निकालात घालून दिलेल्या तत्त्वांचे पालन आ.व.२००८-०९ साठीसुद्धा करावे.

सन्माननीय एटीईच्या निकालानुसार 'इक्विटीवरील परताव्या'ची जागा उत्पन्न उणे स्वीकृत खर्च या आधारावर येणाऱ्या 'नियंत्रित करपूर्व नफ्या' ने घेतली पाहिजे. आम्ही 'परिशिष्ट१ : आयकर मोजणी पद्धत' मध्ये दाखवून दिले आहे की कर भरपाईची गणती दोन प्रकारे करता येईल. (i) आरओई ग्रॉस अप करुन (पुढे येणाऱ्या तक्यात दर्शवल्याप्रमाणे) किंवा (ii) प्रथम नियंत्रित करपूर्व नफा काढून आणि नंतर कराची मोजणी करुन. दोन्ही प्रकारांद्वारे येणारे निकाल सारखेच असतील. टाटा पॉवर - टी ने आयकराची मोजणी करण्यासाठी पहिला मार्ग स्वीकारला आहे.

वर उल्लेख केलेल्या सन्माननीय एटीईच्या आदेशाच्या प्रकाशात सन्माननीय आयोगाने खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे ही गोष्ट विचारात घ्यावी अशी विनंती आहे.

**तक्ता १-३ : आयकराचा अतिरिक्त हक्क**

सर्व आकडे रु. कोटीमध्ये

| तपशील | आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ |
|---|---|---|
| सन्माननीय एटीईच्या निकालावर आधारुन काढलेला सुधारित आयकर | 38 | 40 |
| राज्य वीज नियामक आयोगाने संमत केलेला आयकर | 23 | 25 |
| राज्य वीज नियामक आयोगाने अमान्य केलेली रक्कम | 14 | 15 |
| **एटीईच्या निकालामुळे पुनर्स्थापित होणारा हक्क** | **14** | **15** |

## १.२.४ आ.व. २००७-०८ आणि आ.व. २००८-०९ साठी महसूली तूट/ शिल्लक

सन्माननीय एटीईने त्यांच्या १५ फेब्रुवारी २०११ च्या आदेशात (२००९ च्या अपील क्र.१७३ मध्ये) लांबणीवर टाकण्यात आलेल्या वसूलीवरील व्याजाचा दावा करण्यासंबंधीचे तत्त्व घालून दिले आहे. ग्राहकांना नंतरच्या वर्षांत लागू करण्यासाठी सत्य पडताळा झाल्यानंतर तूट/शिल्लकी वरचे व्याज सन्माननीय आयोग विचारात घेत नाही. सन्माननीय एटीईचा निकाल लक्षात घेऊन त्या-त्या वर्षाची तूट/शिल्लक वसूल होईपर्यंतच्या अंगावर पडणाऱ्या खर्चाची (कॅरिंग कॉस्ट) गणती करणे आवश्यक आहे. आ.व.२००७-०८ आणि आ.व.२००८-०९ साठीच्या सत्य पडताळ्यानंतर सन्माननीय आयोगाने स्वीकृत केलेल्या तूट/शिल्लकीचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे:

**तक्ता १-४: आयकराचा अतिरिक्त हक्क**

रु. कोटी

| तपशील | आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ |
|---|---|---|
| विविध वर्षांसाठी स्वीकृत महसूल तूट / (शिल्लक) | (4) | (25) |

वरील रक्कमांवरील व्याजाची गणती खाली दिली आहे.

**तक्ता १-५ आयकराच्या अतिरिक्त हक्कासंबंधाने अंगावर पडलेला खर्च (कॅरिंग कॉस्ट)**

रु. कोटी

| व्याज वर्ष | व्याजाचा दर % | दोन वर्षांसाठी देय रक्कमांवरील व्याजाचे महिने आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ | आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| कॅरिंग कॉस्टसाठी पात्र रक्कम | | | | (4) | (25) | |
| आ.व.२००७-०८ | 12.48% | 0 | | 0 | 0 | |
| आ.व.२००८-०९ | 12.79% | 12 | | (1) | 0 | |
| आ.व.२००९-१० | 11.87% | 12 | 12 | (0) | (3) | |
| आ.व.२०१०-११ | 12.24% | 12 | 12 | (1) | (3) | |
| आ.व.२०११-१२ | 13.23% | 6 | 6 | (0) | (2) | |
| **एकूण व्याज** | | | | **(2)** | **(8)** | **(10)** |

## १.२.५ वसूली योग्य रक्कमेचा सारांश

सन्माननीय आयोगाने आ.व.२००६-०७, आ.व.२००७-०८ आणि आ.व.२००८-०९ साठी या रक्कमा अमान्य केल्या होत्या आणि आ.व.२००९-१० आणि आ.व.२०१०-११ साठी टॅरिफ दर ठरवताना त्या रक्कमा व्याजाशिवाय विचारात घेतल्या होत्या. जर या रक्कमेची वसूली आ.व.२०११-१२ मध्ये होणार असेल तर ४-५ वर्षांचे व्याज जमा होईल. या गोष्टी मुख्यत: महसूल आधारित असल्याने हे व्याज भारतीय स्टेट बॅंकेच्या पीएलआर दराचा आधार होऊन काढले गेले आहे. याप्रमाणे सन्माननीय एटीईच्या २००९च्या अपील क्र.१७४ मधील निकालाचा परिणाम म्हणून व्याजासकट वसूलीयोग्य एकूण रक्कम येते रु.**३५.७५ कोटी.**

म्हणून, आमच्या नम्र निवेदनाद्वारे आम्ही विनंती करु इच्छितो की, खालील तक्त्यात दिल्यानुसार आधी अमान्य केलेले हक्क त्यावरील कॅरिंग कॉस्टसहित पुन:स्थापित करण्याचा सन्माननीय आयोगाने विचार करावा:

तक्ता १-६:पारेषण प्रणाली टॅरिफमधील वसूलीयोग्य रक्कम

रु.कोटी

| अनु.क्र | तपशील/विषय | | | | | | आ.व.२००६-०७ | आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चालू भांडवलावरील व्याजाच्या फायद्याचे वाटप | | | | | | 1 | 1 | 1 |
| २ | आयकराबाबत घेतलेली चूकीची भूमिका | | | | | | | 14 | 15 |
| ३ | एकूण वसूली योग्य रक्कम (1+2) | | | | | | 1 | 15 | 16 |
| ४ | वसूली योग्य रक्कमेवरील एकूण व्याज (खालीलप्रमाणे गणतीनुसार) | | | | | | 1 | 7 | 5 |
| | व्याज वर्ष | व्याजाचा दर | खालील ४ वर्षांसाठी देय असलेल्या रक्कमांवरील व्याजाचे महिने आ.व.२००६-०७ | आ.व.२००७-०८ | आ.व.२००८-०९ | आ.व.२००९-१० | | | |
| ४अ | आ.व.२००६-०७ | - | - | - | - | - | | | |
| ४ब | अण.व.२००७-०८ | 12.48% | 12 | - | - | - | 0.16 | - | - |
| ४क | आ.व.२००८-०९ | 12.79% | 12 | 12 | - | - | 0.17 | 1.98 | - |
| ४ड. | आ.व. २००९-१० | 11.87% | 12 | 12 | 12 | - | 0.15 | 1.84 | 2 |
| ४इ | आ.व.२०१०-११ | 12.24% | 12 | 12 | 12 | 12 | 0.16 | 1.90 | 2 |
| ४क | आ.व.२०११-१२ | 13.23% | 6 | 6 | 6 | 6 | 0.09 | 1.03 | 1 |
| **५** | **व्याज धरुन एकूण वसूली (3+4)** | | | | | | **2.03** | **22.23** | **21.06** |
| **६** | **वसूलीसाठी पात्र एकूण रक्कम** | | | | | | | | **45.33** |
| **७** | **अधिक: आ.व.२००७-०८ आणि आ.व.२००८-०९ सालांसाठी अमान्य केल्या गेलेल्या तूट:/शिल्लकीवरील व्याज** | | | | | | | | **(9.57)** |
| **८** | **वसूल करण्याची एकूण रक्कम** | | | | | | | | **35.75** |

## १.३ आ.व. २००९-१० ची कामगिरी

### १.३.१ कार्यचलन आणि देखभाल (ओ आणि एम) खर्च

- **कर्मचारी खर्च**

सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या ५७ कोटी रु.च्या सापेक्ष आ.व. २००९-१० साठी कर्मचारी निगडित एकूण खर्च **५५ कोटी रु.** झाला.

- **प्रशासकीय आणि सर्व साधारण (ए आणि जी) खर्च:**

आ.व. २००९ - १० साठी ए आणि जी खर्च २९ कोटी रु. होता जो सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या खर्चापेक्षा कमी आहे. भांडवली खर्चाशी निगडित ए आणि जी खर्चाच्या बाबतीत ते थेट त्या योजनांच्या खर्चात समाविष्ट केले गेले आहेत, म्हणजेच त्यांचे भांडवलीकरण केले गेले आहे. प्रत्यक्षातील ए आणि जी खर्च कमी असण्याचे कारण टाटा पॉवर-टीचा कॉर्पोरेट ए आणि जी खर्चातील कमी वाटा हे आहे. आ.व. २००९-१० मध्ये ‘वितरणाच्या मूलभूत क्षेत्रा’ साठीचा ए आणि जी खर्च खूप वाढला होता. त्यामुळे, एचओ आणि एसएस ए आणि जी खर्चाचा मोठा वाटा वितरण व्यवसायावर टाकण्यात आला ज्यामुळे टाटा पॉवर-टीचा ए आणि जी खर्चातील वाटा कमी झाला.

- **आर आणि एम खर्च:**

सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या १२ कोटी रु.च्या तुलनेत एकूण आर आणि एम खर्च ११ कोटी रु. झाला. सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या खर्चापेक्षा झालेला आर आणि एम खर्च कमी आहे.

- **एकंदरीत झालेला कार्यचलन आणि देखभाल (ओ आणि एम) खर्च:**

आ.व. २००९-१० साठी झालेला ओ आणि एम खर्च **९६ कोटी रु.** आहे. आ.व. २००९–१० साठीच्या एपीआरमध्ये सन्माननीय आयोगाने एकंदर ओ आणि एम खर्च **१०१ कोटी रु.** संमत केला होता. ओ आणि एम खर्चाचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे:

**तक्ता १-७: ओ आणि एम खर्च - आ.व. २००९-१०**

**रु. कोटी**

| **तपशील** | **आयोगाद्वारे संमत** | **आ.व.२००९-१० (प्रत्यक्ष)** |
|---|---|---|
| कर्मचारी खर्च | 57 | 55 |
| ए. आणि जी.खर्च (ब्रँड इक्विटी धरुन) | 32 | 29 |
| आर आणि एम खर्च | 12 | 11 |
| **एकूण** | **101** | **96** |

## १.३.२ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आ.व.२००९-१० साठी प्रत्यक्ष भांडवली खर्च ३२ कोटी रु. होता आणि बांधकामादरम्यानचे व्याज आणि भांडवलीकरण केलेले खर्च जमेस धरुन प्रत्यक्ष भांडवलीकरण **१६७ कोटी रु.** होते.

## १.३.३ व्याज आणि वित्त आकार

व्याजाचा खर्च खालील तीन शीर्षाखाली काढला गेला आहे

- कर्जावरील व्याज
- चालू भांडवलावरील व्याज
- इतर वित्त आकार

- **कर्जावरील व्याज**

मागील वर्षांसाठी (आ.व.२००३-०४च्या भांडवली खर्चाच्या ७० टक्के तसेच आ.व.२००४-०५ आणि आ.व.२००५-०६ च्या भांडवलीकरणाच्या ७० टक्के) निर्देशात्मक कर्जांवरील व्याजा व्यतिरिक्त टाटा पॉवरने आयडीएफसी-१ (४५० कोटी रु.), आयडीबीआय-१ (४०० कोटी रु.) आणि आयडीबीआय-२ (३०० कोटी रु.) ही कर्जे आ.व.२००६-०७ ते आ.व.२००९-१० या कालावधीतील खर्चासाठी

लागणाऱ्या निधीच्या तरतूदीसाठी घेतली आहेत. या बाबी आणि या कर्जांवरील व्याज लक्षात घेता, सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या **१९.८५ कोटी रु.** च्या सापेक्ष आ.व.२००९-१० साठी व्याजाचा आकार **२८ कोटी रु.** एवढा येतो.

- **चालू भांडवलावरील व्याज**

चालू भांडवलावरील व्याजाची मोजणी सन्माननीय आयोगाच्या टॅरिफ नियमावलीमध्ये नमूद केलेल्या घटकांच्या आधारावर केली गेली आहे.

आ.व. २००९-१० साठी भांडवली खर्चावरील व्याजाची मोजणी करण्याच्या हेतूसाठी, आ.व २००९-१० साठी एपीआर दाखल करण्यासमयी अस्तित्वात असलेल्या एसबीआयच्या अल्प कालावधी पीएलआरचा आधार घेऊन व्याजाचा दर १३ टक्के असा धरण्यात आला आहे.

सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या ५.४६ कोटी रु.च्या सापेक्ष आ.व.२००९-१० साठी टाटा पॉवर-टी च्या चालू भांडवलावरील एकूण व्याज ७ कोटी रु. एवढे येते.

- **इतर वित्त आकार**

इतर वित्त आकार **०.३५** कोटी रु. आहेत. आ.व.२००९-१० च्या एपीआर आदेशात सन्माननीय आयोगाने मंजूर केलेला आकडा होता ०.१२ कोटी रुपये

### १.३.४ घसारा

टाटा पॉवर - टीने घसाऱ्याची मोजणी एमईआरसी (टर्म्स ॲण्ड कंडिशन्स ऑफ टॅरिफ), २००५ मध्ये नमूद केलेले दर लागू करुन केली आहे. वीज नियामक आयोगाने घालून दिलेल्या या तरतूदींच्या आधारे आ.व.२००९-१० साठी घसारा **३२ कोटी रु.** इतका येतो, जो सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या आकड्याइतकाच आहे.

### १.३.५ इक्विटीवरील परतावा

भांडवलीकरण केलेला खर्च आणि ७०:३० असे कर्ज: इक्विटी गुणोत्तराचे मान्य प्रमाण या आधारावर आ.व. २००९-१० साठी १४ टक्के दराने इक्विटीवरील परतावा **७० कोटी रु.** इतका येतो. सन्माननीय आयोगाने तो **६६ कोटी रु.** इतका संमत केला होता.

### १.३.६ टाटा पॉवर - टी चा आ.व.२००९-१० साठी आयकर

'सन्माननीय एटीई आदेशाचा परिणाम' यात स्वीकृत केल्या गेलेल्या आयकर मोजणीच्या पद्धतीचा आधार घेऊन आ.व.२००९-१० साठी टाटा पॉवर - टी चा आयकर **४१ कोटी रु.** इतका येतो. सन्माननीय आयोगाने तो **२४ कोटी रु.** इतका संमत केला होता.

### १.३.७ वैधानिक विनियोग

आकस्मिक निधीसाठी योगदानाची मोजणी जीएफएच्या **०.५० टक्के** दराने केली गेली आहे.सन्माननीय आयोगाने त्यांच्या दिनांक ३ सप्टेंबर २०१० च्या २००९-१० च्या एपीआर आदेशात घेतलेल्या भूमिकेशी हे सुसंगत आहे. आ.व.२००९-१० साठी वैधानिक विनियोग **६ कोटी रु.** इतका येतो. सन्माननीय आयोगाने २००९-१० च्या एपीआर आदेशात तो **२.९४ कोटी रु**. इतका संमत केला होता.

### १.३.८ बिगर टॅरिफ उत्पन्न

आ.व.२००९-१० साठी सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या **१०.५० कोटी रु**.च्या सापेक्ष टाटा पॉवर-टीचे बिगर-टॅरिफ उत्पन्न **१२ कोटी रु.** होते. बिगर टॅरिफ उत्पन्नामध्ये ६.८४ कोटी रु.च्या आवर्ती गोष्टी आहेत आणि ५.४४ कोटी रु.च्या विना-आवर्ती गोष्टी आहेत.

### १.३.९ टाटा पॉवरचा भार नियंत्रण केंद्र (एलसीसी) खर्च

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आता ओ आणि एम खर्चात समाविष्ट करण्यात येणारा टाटा पॉवर-टीचा एलसीसी खर्चाचा वाटा ३.०० कोटी रु. येतो.

**तक्ता १-८ : आ.व २००९-१० साठी खर्चाची हिस्सेदारी**

(रु. कोटी)

| व्यवसाय क्षेत्र | आ.व २००९-१० |
|---|---|
| निर्मिती | 1.72 |
| पारेषण | 3.00 |
| वितरण | 1.27 |

पुर्वापार एलसीसी टाटा पॉवर- टीचा भाग असल्याने टाटा पॉवर-जी आणि टाटा पॉवर-डी चा वाटा टाटा पॉवर-टीच्या एआरआर मधून वजा होईल.

### १.३.१० पारेषण उपलब्धते संबंधाने प्रोत्साहनपर सवलत (इन्सेंटिव)

आ.व.२००९-१० साठी टाटा पॉवरच्या पारेषण प्रणालीची उपलब्धता एसएलडीसीने **९८.८५ टक्के** इतकी प्रमाणित केली आहे. प्रत्यक्ष उपलब्धतेच्या आधारावर प्रोत्साहनपर सवलत **२.३१ कोटी रु**. इतकी येते.

### १.३.११ आ.व.२००९-१० साठी वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर)आणि वसूली योग्य निव्वळ महसूल

वर वर्णन केलेल्या खर्चांच्या आधारावर टाटा पॉवर-टीची आ.व.२००९-१० साठीची सुधारित वार्षिक महसूल आवश्यकता खाली दिल्याप्रमाणे **२६७ कोटी रु.** इतकी येते.

तक्ता १-९: वार्षिक पररेषण आकार आ.व २००९-१०

(रु. कोटी)

| तपशील | आयोगाद्वारे संमत | आ. व. २००९-१०(प्रत्यक्ष) | फरक |
|---|---|---|---|
| ओ आणि एम आकार (एलसीसी खर्च निर्मिती आणि वितरण यामध्ये वाटून दिल्यानंतर) | 98 | 93 | 5.5 |
| दीर्घकालीन कर्जावरील व्याज | 20 | 28 | (7.8) |
| चालू भांडवलावरील व्याज | 5 | 7 | (1.8) |
| इतर वित्त आकार | 0.12 | 0.35 | (0.2) |
| घसारा | 32 | 32 | 0.1 |
| इक्विटीवरील परतावा | 66 | 70 | (3.7) |
| आयकर | 24 | 41 | (16.9) |
| वैधानिक विनियोग | 3 | 6 | (3.4) |
| **वार्षिक पारिषेण आकार** | 249 | 277 | **(28.2)** |
| अधिक: इन्सेंटिव | - | 2 | (2.3) |
| **एकूण: पारेषण आकार** | 249 | 279 | **(30.5)** |
| वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न | 11 | 12 | (1.8) |
| **पारेषण टॅरिफपासनूची निव्वळ एकत्रित महसूल आवश्यकता** | **238** | **267** | **(28.7)** |

### १.३.१२ आ.व.२००९-१० मधील फायदा आणि तोट्याची हिस्सेदारी

टाटा पॉवर-टी ने त्यांच्या निवेदनात खर्चाच्या विविध शीर्षांखाली झालेला प्रत्यक्ष खर्च आणि त्यातील फरकाबद्दलची कारणे सादर केली आहेत.

खर्चाच्या विविध शीर्षांची हाताळणी **भाग ४.१३** मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामध्ये दिलेल्या वर्गवारीच्या आणि कारणांच्या आधारावर आ.व.२००९-१० च्या खर्चापैकी ओ आणि एम खर्च वगळता बहुतेक गोष्टी नियंत्रणाबाहेरच्या होत्या.

- **ओ आणि एम खर्चातील फायदा आणि तोटा**

टाटा पॉवर-टीच्या फायदा आणि तोट्याची हिस्सेदारी वर्णन केलेल्या टॅरिफ नियमावलीच्या तसेच खर्चाच्या विभागवारीच्या आधारावर काढण्यात आली आहे. या आधारावर, वितरण परवानाधारकाला देण्याचा फायद्याचा वाटा आणि टाटा पॉवर-टीचा निव्वळ हक्क अनुक्रमे २ कोटी रु. आणि ९६ कोटी रु. इतका येतो.

## १.३.१३ पारेषण व्यवसायातील महसूल

आ.व.२००९-१० साठीचा महसूल दोन टॅरिफ आदेशांच्या माध्यमातून मिळाला ते म्हणजे २६ मे २००८ चा आदेश आणि २८ मे २००९ चा आदेश, आणि यापैकी प्रत्येक आदेश वर्षातील अंशत: कालावधीसाठी लागू होता. खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे आ.व.२००९-१० साठी मिळवलेला महसूल **१९८ कोटी रु.** होता.

**तक्ता १-१०: आ. व २००९-१० साठी महसूल**

(रु. कोटी)

| कालावधी | लागू असणारा टॅरिफ आदेश | दरमहा वसूल केलेला पारेषण आकार | महिन्यांची संख्या | एकूण महसूल |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-०९ ते मे -०९ | २६ मे २००८ | 20.69 | 2 | 41 |
| जून-०९ ते मार्च -१० | २८ मे २००९ | 15.65 | 10 | 157 |
| **आ. व २००९-१०** | | | | **198** |

## १.३.१४ आ.व.२००९-१० साठी निव्वळ वार्षिक पारेषण आकार आणि तूट

आ.व.२००९-१० च्या खर्चाची वर्गवारी, फायदा आणि तोट्याच्या हिस्सेदारीसाठी केलेल्या जुळवणूकीसह, खाली दिली आहे.

**तक्ता १-११ : निव्वळ पातळीवरील वार्षिक पारेषण आकार आणि तूट -आ.व.२००९-१०**

रु.कोटी

आ.व. २००९-१० (प्रत्यक्ष)

| अनु क्र. | तपशील | संमत | नियमावलीनुसार हक्क | नियंत्रणात्मक घटकांपासून होणारा कार्यक्षमता फायदा/(तोटा) जो ग्राहकांबरोबर वाटून घेण्यात आला | नियंत्रणात्मक घटकांपासून होणाऱ्या कार्यक्षमता फायदा/तोटा च्या परिणामानंतर निव्वळ हक्क (गंगाजळीमध्येजमा केलेल्या पैशाच्या समावेशसह) |
|---|---|---|---|---|---|
| **I** | **महसूल** | **11** | | | **210** |
| | - पारेषण आकार | | | | 198 |
| | - इतर उत्पन्न | 11 | | | 12 |
| | | | | | |
| II | **खर्च** | | | | |
| १. | कार्यभार आणि देखभाल खर्च (एलसीसी खर्च निर्मिती आणि वितरण यामध्ये वाटून दिल्यानंतर) | 98 | 98 | 2 | 96 |
| २. | घसारा, घसारासापेक्ष उचल धरुन | 32 | 32 | | 32 |
| ३. | दीर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | 20 | 28 | | 28 |
| ४. | चालू भांडवलावरील व्याज | 5 | 7 | | 7 |
| ५. | इतर वित्त आकार | 0 | 0 | | 0 |
| ६. | प्रोत्साहनपर सवलत (इन्सेंटिव) | - | 2 | | 2 |
| ७. | वैधानिक विनियोग /आकस्मिक निधी | 3 | 6 | | 6 |
| ८. | आयकर | 24 | 41 | | 41 |
| ९. | इक्विटीवरील परतावा | 66 | 70 | | 70 |
| **१०.** | **एकूण खर्च** | **249** | **285** | | **283** |
| **III** | **आ.व. २००९-१० साठी शुद्ध (तूट)/शिल्लक (I-II)** | | | | **(73)** |

वरील तक्यात दिसून येते त्याप्रमाणे आ.व.२००९-१० साठी शुद्ध तूट **(७३)कोटी रु.** आहे जिची मोजणी फक्त आ.व.२००९-१० साठी अर्जित महसूल आणि आ.व. २००९-१० साठीचा खर्च यातील फरक या रितीने करण्यात आली आहे. परंतु आ.व. २००९-१०मध्ये (टॅरिफच्या माध्यमातून) अर्जित केलेल्या महसूलाची रचना फक्त आ.व.२००९-१० च्या एआरआर व्यतिरिक्त मागील बाकी/शिल्लक वसूल करण्याच्या दृष्टीने केली आहे. म्हणून आ.व.२००९-१० ची खरी तूट काढण्यासाठी वर काढण्यात आलेल्या शुद्ध तूटीमध्ये मागील तूट/शिल्लकीची जुळवणूक करणे आवश्यक आहे. अशा रितीने काढण्यात आलेली आ.व.२००९-१० साठीची निव्वळ (तूट)/शिल्लक **(४७) कोटी रु.** येते.

**तक्ता १-१२: निव्वळ (तूट)/शिल्लक - आ. व २००९ - १०**

(रु.कोटी)

| अनु क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| 1 | आ. व २००९-१० साठी शुद्ध (तूट)/शिल्लक | (73) |
| २ | अधिक: आ. व २००८-०९ साठी महसूली (तूट)/शिल्लक (त्या वर्षाच्या सत्य पडताळ्यानंतर) - दिनांक३ सप्टेंबर २०१० चा टॅरिफ आदेश | 25 |
| 3 | निव्वळ (तूट)/शिल्लक | (47) |

## १.४ आ.व.२०१०-११ ची कामगिरी

हा भाग आ.व.२०१०-११ च्या कामगिरीविषयी आहे. आणि त्या अनुषंगाने टाटा पॉवर-टी ने केलेली आ.व.२००९-१० साठी एपीआर याचिका, दिनांक ३ सप्टेंबरचा एपीआर आदेश आणि सन्माननीय एटीईने २००९ च्या अपील क्र.१७४ मध्ये दिलेला दिनांक १४ फेब्रुवारी २०११ चा आदेश या गोष्टीही येथे विचारात घेण्यात आल्या आहेत. टाटा पॉवर-टीची आ.व.२०१०-११ ची प्रत्यक्ष कामगिरी या प्रकरणाच्या खालील परिच्छेदांत दिली आहे. तसेच, सन्माननीय आयोगाने दिलेल्या विविध **निर्देशांचे पालन करण्याविषयीची स्थिती काय आहे याची चर्चा प्रकरण ८ मध्ये केली आहे.**

### १.४.१ महसूल

सन्माननीय आयोगाचा ऑगस्ट २०१० पर्यंत लागू असणारा २८ मे २००९चा आदेश आणि १ सप्टेंबर २०१० पासून लागू असणारा ३ सप्टेंबर २०१० चा आदेश यांच्या आधारावर टाटा पॉवरने राज्य पारेषण सार्वजनिक सेवा पुरवठादाराला देयक दिले आहे. त्याप्रमाणे, टाटा पॉवर-टी ने आ.व.२०१०-११ साठी प्रमाणभूत पद्धतीने महसूल विचारात घेतला आहे. म्हणून आ.व.२०१०-११ साठी एकूण महसूल **२५१ कोटी रु.** इतका येतो.

**तक्ता१-१३: आ.व २०१०-११ साठी महसूल**

(रु. कोटी)

| कालावधी | लागू असणारा टॅरिफ आदेश | दरमहा वसूल केलेला पारेषण आकार | महिन्यांची संख्या | एकूण महसूल |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-१० ते आगस्ट -१० | २८ मे २००९ | 15.65 | 5 | 78 |
| सप्टेंबर-१० ते मार्च -११ | ३ सप्टेंबर २०१० | 24.73 | 7 | 173 |
| **आ. व. २०१०-११** | | | | **251** |

## १.४.२ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आ.व.२०१०-११ साठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरण अनुक्रमे **२२९.४७ कोटी रु.** आणि **१२९ कोटी रु.** आहे. आ.व.२०१०-११ चे विभागवार भांडवलीकरण खाली दिले आहे.

## १.४.३ ओ आणि एम खर्च

- **कर्मचाऱ्यांवरील खर्च**

आ.व.२०१०-११ साठी कर्मचारी निगडित एकूण खर्च **५९ कोटी रु.** आहे आणि तो सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या आकड्याशी सुसंगत आहे.

- **ए आणि जी खर्च**

आ.व. २०१०-११ साठीचा प्रशासकीय आणि सर्वसाधारण खर्च स्वीकृत **३३ कोटी रु.** पेक्षा कमी म्हणजे **३१ कोटी रु.** आहे.

- **आर आणि एम खर्च**

सन्माननीय आयोगाने आ.व.२०१०-११ साठी संमत केलेल्या दुरुस्ती आणि देखभालीच्या **१२ कोटी रु.** खर्चाऐवजी प्रत्यक्ष खर्च **१५** कोटी रु. झाला. वाढीव आर आणि एम खर्चाची कारणे? यामध्ये देण्यात आली आहेत.

- **एकंदरीत झालेला ओ आणि एम खर्च**

आ.व. २०१०-११ साठी कार्यचलन व देखभाल खर्च **१०५.२७** कोटी रु. झाला आणि सन्माननीय आयोगाद्वारे हा खर्च **१०७ कोटी** रु. इतका संमत केला गेला होता. टाटा पॉवर-टी विनंती करत आहे की सन्माननीय आयोगाने याला स्वीकृती द्यावी.

**तक्ता१-१४: आ.व. २०१०-११ साठी ओ आणि एम खर्च**

(रु. कोटी)

| तपशील | आयोगाद्वारे संमत | आ.व. २०१०-११ एच १ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१०-११ एच २ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१०-११ (प्रत्यक्ष) |
|---|---|---|---|---|
| कर्मचाऱ्यांवरील खर्च | 61.32 | 28 | 31 | 59.25 |
| ए.आणि जी. खर्च (ब्रँड इक्विटी धरुन) | 33.31 | 16 | 15 | 31.31 |
| आर आणि एम खर्च | 12.46 | 6 | 9 | 14.71 |
| **एकूण** | **107** | **50** | **56** | **105.27** |

## १.४.४ घसारा

सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या ३८ कोटी रु.च्या सापेक्ष आ.व.२०१०-११ साठी घसारा **३८ कोटी रु.** आहे.

## १.४.५ व्याज आणि वित्त आकार

- **कर्जावरील व्याज**

आ.व.२००३-०४ ते आ.व.२००९-१० या कालावधीतील भांडवलीकरणाला लागणाऱ्या निधीसाठी घेतलेल्या कर्जाव्यतिरिक्त टाटा पॉवर - जी ने पुढील कारणांसाठी नवीन कर्जे घेतली आहेत: (१) आ.व.२०१०-११ तील भांडवलीकरणासाठी निधी; (२) मागील वर्षांत घेतलेल्या निर्देशात्मक कर्जांसाठी नवीन निधी पुरवठा; आणि (३) मागील प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमाणे आयडीबीआय-२ कर्जाच्या जागी सुधारित अटींवरील नवीन कर्ज. आ.व.२०१०-११ च्या भांडवलीकरण निधीसाठी घेतलेल्या नवीन कर्जांचा तपशील **भाग** ५.७ मध्ये दिला आहे.

आधीच्या आणि नवीन कर्जांच्या अटी आणि व्याज दर विचारात घेता आ.व.२०१०-११ साठी व्याजाचा आकार, सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या ३०.०८ कोटी रु.च्या सापेक्ष **३६.५९ कोटी रु.** झाला.

- **चालू भांडवलावरील व्याज**

चालू भांडवलावरील व्याजाची मोजणी सन्माननीय आयोगाच्या टॅरिफ नियमावलीमध्ये नमूद केलेल्या घटकांच्या आधारावर केली गेली आहे. टॅरिफ नियमावलीमध्ये नमूद केलेल्या व्यजाच्या दरात (भारतीय स्टेट बँकेचा अल्प कालावधीसाठीचा मुख्य व्याज दर (पीएलआर)) वर्षभरात बदल होत आहे. मात्र, आ.व.२०१०-११ च्या चालू भांडवलावरील व्याजाचा अंदाज काढण्यासाठी, नियमावलीतील तरतूदींशा सुसंगत ठरेल अशा पद्धतीने, आ.व.२०१०-११ साठी एपीआर याचिका दाखल करतेवेळी अस्तित्वात असलेला ११.७५ टक्के व्याजाचा दर (एसबीआय पीएलआर) विचारात घेण्यात आला आहे. सन्माननीय आयोगाने संमत केलेल्या **५.६८ कोटी रु.**च्या सापेक्ष टाटा पॉवर-टी चे आ.व.२०१०-११ साठी चालू भांडवलावरील एकूण व्याज **६.७७** कोटी रु. आले.

- **इतर वित्त आकार**

देय वित्त आकारासाठी आ.व.२०१०-११ साठी **०.५** कोटी रु. खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.

### १.४.६ नियंत्रणात्मक इक्विटीवरील परतावा

नियंत्रणात्मक इक्विटीची सुरुवातीची शिल्लक, भांडवलीकरण केलेला खर्च आणि कर्ज: इक्विटी गुणोत्तराचे ७०:३० असे मान्य प्रमाण या गोष्टींच्या आधारावर आ.व.२०१०-११ साठी नियंत्रणात्मक इक्विटीवरील परतावा सन्माननीय आयोगाने स्वीकृत केलेल्या **७३ कोटी रु.**ऐवजी **७६ कोटी रु.** येतो.

### १.४.७ प्रोत्साहनपर सवलत (इन्सेंटिव)

टाटा पॉवर-टी ने आ.व.२०१०-११ मध्ये ९८.७१ टक्के पारेषण प्रणाली उपलब्धता साध्य केली. ९८ टक्के या लक्षित उपलब्धतेपेक्षा ती जास्त असल्याने कंपनी प्रोत्साहनपर सवलत मिळण्यास पात्र आहे. प्रत्यक्ष उपलब्धतेच्या आधारावर केलेल्या मोजणीनुसार ही प्रोत्साहनपर सवलत **२.०८ कोटी रु.** येते.

### १.४.८ आयकर

याआधी ज्याची चर्चा केली आहे त्या सन्माननीय एटीईच्या निष्कर्षांवर आधारुन टाटा पॉवर-टी ने आयकराची मोजणी केली आहे. अशीच पद्धत आ.व.२००९-१० च्या आयकर मोजणीसाठी वापरण्यात आली होती. टाटा पॉवर -टी ने आता आ.व.२०१०-११ च्या आयकराची मोजणी आ.व. २००९-१० साठी वापरलेली पद्धत वापरुन केली आहे आणि या आधारावर आ.व.२०१०-११ च्या आयकराची रक्कम **३०.९७ कोटी रु.** येते. सन्माननीय आयोगाने एआरआर आदेशात आयकराची रक्कम ३०.९७ कोटी रु. अशी संमत केली होती.

### १.४.९ वैधानिक विनियोग

टाटा पॉवर-टी ने टॅरिफ नियमावलीत परवानगी दिल्याप्रमाणे आकस्मिक निधीसाठीच्या विनियोगाची रक्कम मालमत्तेच्या मूळ मूल्याच्या **०.५० टक्के** अशी ठेवली आहे. त्याप्रमाणे या वैधनिक विनियोगासाठी **७ कोटी रु.**ची तरतूद केली गेली आहे. सन्माननीय आयोगाने यासाठी संमत केलेली रक्कम ३.३९ कोटी रु. होती.

### १.४.१० बिगर टॅरिफ उत्पन्न

टाटा पॉवर-टी ने आ.व.२०१०-११ साठी बिगर टॅरिफ उत्पन्नाचा **१३ कोटी रु.** असा अंदाज केला आहे ज्यामध्ये ६ कोटी रु. च्या आवर्ती गोष्टींचा आणि ७ कोटी रु.च्या विना-आवर्ती गोष्टींचा समावेश आहे.

### १.४.११ टाटा पॉवर भार नियंत्रण केंद्राच्या खर्चाची विभागणी

भार नियंत्रण केंद्राच्या खर्चाची विभागणी टाटा पॉवर - जी साठी **१.५ कोटी रु.** आणि टाटा पॉवर-डी साठी **१.२ कोटी रु.** अशी येते.

### १.४.१२ एकत्रित महसूल आवश्यकता

वर वर्णन केलेल्या विविध खर्चांवर आधारित टाटा पॉवर-टी ची आ.व.२०१०-११ साठी सुधारित एकत्रित महसूल आवश्यकता खाली दिली आहे:

**तक्ता १.१५: आ.व २०१०-११ साठी वार्षिक पारेषण आकार**

(रु. कोटी)

| तपशील | आयोगाद्वारे संमत | आ.व. २०१०-११ प्रत्यक्ष | फरक |
|---|---|---|---|
| ओ.आणि एम.आकार (एलसीसी खर्च निर्मिती आणि वितरण यामध्ये वाटून दिल्यानंतर) | 104 | 103 | (1) |
| दीर्घकालीन कर्जावरील व्याज | 30 | 37 | 7 |
| चालू भांडवलावरील व्याज | 6 | 7 | 1 |
| इतर वित्त आकार | - | 0.5 | 0 |
| घसारा | 38 | 38 | (1) |
| इक्विटीवरील परतावा | 73 | 76 | 3 |
| आयकर | 31 | 30 | (1) |
| वैधानिक विनियोग | 3 | 7 | 4 |
| वार्षिक पारेषण आकार | 285 | 297 | 12 |
| अधिक: प्रोत्साहनपर सवलत (इन्सेंटिव) | - | 2 | 2 |
| एकूण पारेषण आकार | 285 | 299 | 14 |
| उणे: बिगर टॅरिफ उत्पर्न्न | 11 | 13 | 2 |
| पारेषण टॅरिफपासनूची निव्वळ एकत्रित महसूल आवश्यकता | 275 | 287 | 13 |

### १.४.१३ आ.व.२०१०-११ मधील फायदा आणि तोट्याची हिस्सेदारी

भाग ४.१३ मध्ये दिलेल्या वर्गवारी आणि कारणांचा आधार घेऊन असे सांगता येईल की ओ आणि एम खर्च वगळता आ.व.२०१०-११ साठीच्या खर्चाच्या बहुतेक गोष्टी नियंत्रणा बाहेरच्या आहेत.

- **ओ आणि एम खर्च**

सन्माननीय आयोगाने १०७.०९ कोटी रु. चा खर्च मंजूर केला आहे ज्यामध्ये टाटा ब्रँड इक्विटीच्या खर्चाचा समावेश आहे. यासाठीचा प्रत्यक्ष खर्च १०५.२७ कोटी रु. झाला. त्याप्रमाणे, वितरण परवानाधरकाबरोबर वाटून घ्यावयाचा तोटा (०.६१) कोटी रु. येतो आणि निव्वळ हक्काची रक्कम १०६.४८ कोटी रु. येते. .

### १.४.१४ आ.व. २०१०-११ साठी (तूट)/शिल्लक

सन्माननीय आयोगाने त्यांच्या ३ सप्टेंबर २०१० आणि २८ मे २००९ च्या आदेशांत मंजूर केलेल्या पारेषण आकारापासून प्राप्त महसूल आणि बिगर टॅरिफ उत्पन्न विचारात घेता आ.व.२०१०-११ साठी (तूट)/शिल्लक **(३६) कोटी रु.** येते. तूटीची मोजणी खालीलप्रमाणे केली आहे.

-

**तक्ता१-१६ निव्वळ वार्षिक महसूल आवश्यकता आणि तूट - आ.व.२०१०-११**

रु. कोटी

| अनु क्र. | तपशील | संमत | नियमावलीनुसार हक्क | नियंत्रणात्मक घटकांपासून होणारा कार्यक्षमता फायदा/(तोटा) जो ग्राहकांबरोबर वाटून घेण्यात आला | नियंत्रणात्मक घटकांपासून होणाऱ्या कार्यक्षमता फायदा/तोटा च्या परिणामानंतर निव्वळ हक्क (गंगाजळीमध्ये जमा केलेल्या पैशाच्या समावेशसह) |
|---|---|---|---|---|---|
| I | महसूल | | | | 264 |
| | - पारेषण आकार | | | | 251 |
| | - इतर उत्पन्न | 11 | 13 | | 13 |
| | | | | | |
| II | **खर्च** | | | | |
| | १.कार्यभार आणि देखभाल खर्च (एलसीसी खर्च निर्मिती आणि वितरण यामध्ये वाटून दिल्यानंतर) | 104 | 104 | 1 | 103 |
| | २.घसारा, घसारासापेक्ष उचल धरुन | 38 | 38 | | 38 |
| | ३दीर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | 30 | 37 | | 37 |
| | ४चालू भांडवलावरील व्याज | 6 | 7 | | 7 |
| | ५इतर वित्त आकार | - | 0.46 | | 0.46 |
| | ६प्रोत्साहनपर सवलत (इन्सेंटिव) | - | 2 | | 2 |
| | ७वैघानिक विनियोग /आकस्मिक निधी | 3 | 7 | | 7 |
| | ८आयकर | 31 | 30 | | 30 |
| | ९इक्विटीवरील परतावा | 73 | 76 | | 76 |
| | १०एकूण खर्च | 286 | 301 | 1 | 300 |
| IV | शुद्ध शिल्लक /(तूट)- (I-II) | | | | (36) |

## १.४.१५ आ.व.२०१०-११ साठी संचित (तूट)/शिल्लक

वरील तक्त्यावरुन दिसून येईल की आ.व.२०१०-११ साठीची शुद्ध तूट **(३६) कोटी रु.** आहे जिची मोजणी फक्त आ.व.२०१०-११ साठी अर्जित महसूल आणि आ.व.२०१०-११ साठीचा खर्च याप्रकारे केली आहे. परंतु आ.व.२०१०-११ मध्ये (टॅरिफच्या माध्यमातून) अर्जित केलेल्या महसूलाची रचना फक्त आ.व.२०१०-११ च्या एआरआर व्यतिरिक्त मागील बाकी / शिल्लक वसूल करण्याच्या दृष्टीने केली आहे. म्हणून आ.व.२०१०-११ ची खरी तूट काढण्यासाठी वर काढण्यात आलेल्या शुद्ध तूटीमध्ये मागील तूट/शिल्लकीची जुळवणूक करणे आवश्यक आहे. अशा रितीने काढण्यात आलेली आ.व.२०१०-११ साठीची निव्वळ (तूट) /शिल्लक खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे **(९३) कोटी रु.** येते.

**तक्ता १-१७: निव्वळ वार्षिक महसूल आवश्यकता आणि तूट - आ.व. २०१०-११**

(रु. कोटी)

| तपशील | आ.व. २०१०-११ |
|---|---|
| शुद्धा शिल्लक/(तूट) | (36) |
| अधिक: सन्मामनीय एटीईच्या आदेशाच्या परिणामस्वरुप (कृपया ३ सप्टें २०१० च्या टॅरिफ आदेशातील १०१ पानांपैकी पान क्र. ९३ वर दिलेल्या तक्त्यातील ओळ क्र.१७ पहा) | (7) |
| **आ.व.२०१०-११ साठी निव्वळ महसूल (तूट)/शिल्लक** | **(43)** |

## १.५ मागील कालावधीची एकूण वसूली

या भागात आ.व. २०११-१२ मध्ये वसूल करणे आवश्यक असलेल्या मागील वसूलींचा, त्यावरील व्याज खर्चासह, सारांश दिला आहे.

आ.व.२०११-१२ पर्यंतच्या मागील कालावधीच्या वसूलींची, त्यावरील व्याज खर्चासह, मोजणी केली गेली आहे आणि ती खालील तक्त्यात सादर केली गेली आहे. ती रक्कम **१३८ कोटी रु.** इतकी येते.

**तक्ता १-१८ व्याजाच्या खर्चासह मागील वसूली**

रु.कोटी

| | | | मुद्दलाची रक्कम | आ.व.२०१२ पर्यंतचे व्याज | आ.व.२०११-१२ मधील एकूण वसूली |
|---|---|---|---|---|---|
| १ १४ फेब्रवारी २०११च्या एटीई आदेशाच्या परिणाम स्वरुप | | | 36 | | |
| २ आ.व.२००९-१० ची तूट/(शिल्लक) | | | 47 | | |
| ३ आ.व. २०१०-११ ची तूट/(शिल्लक) | | | 43 | | |
| ४ आ.व.२००९-१० च्या तूटी/शिल्लकी वरील व्याज | **महिने** | **व्याजदर** | | | |
| -आ.व.२०१०-११ साठी | **12** | **12.24%** | | **6** | |
| -आ.व.२०११-१२ साठी | **6** | **13.23%** | | **3** | |
| ५ आ.व. २०१०-११ च्या तुटी /(शिल्लकी) वरील व्याज | **महिने** | **व्याजदर** | | | |
| -आ.व.२०१०-११ साठी | **0** | **12.24%** | | | |
| -आ.व.२०११-१२ साठी | **6** | **13.23%** | | **3** | |
| **६ एकूण** | | | **126** | **12** | **138** |

आम्ही सन्माननीय आयोगाला विनंती करतो की टॅरिफमधील योग्य त्या जुळवणूकीसह वरील वसूली करण्यासाठी परवानगी द्यावी.